02-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/01/2025 10:21 PM Page 1



## निवडक

### कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावीचा ९१.२५ टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १ :** नुकत्याच जाहीर झालेल्या गोवा माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावीचा निकाल ९१.२५ टक्के इतका लागला. कला शाखा व वाणिज्य शाखा इतका निकाल लागला.

कला शाखेतून बसलेल्या ४८ पैकी ४४ तर वाणिज्य शाखेत ३२ पैकी २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेतून कुमारी अनिशा यशवंत हळदणकर ८७.३३ टक्के व मयुरेश राजेंद्र गोसावी ८७.३३ टक्के प्रथम आले.

संस्कृती नीलकंठ पाळणी ८६.१७ टक्के तृतीय, समेश गावडे ८९. १७ टक्के चौथा तर अमोघ सावंत ७८ टक्के, हर्षा पालयेकर ७७.३३ टक्के पाचवी आली. ६ ही विशेष प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले. कला शाखेत ६ विशेष प्राविण्य श्रेणीत, ९ प्रथम श्रेणीत, तर द्वितीय वर्गात २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

वाणिज्य शाखेतून ३२ पैकी २९ उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेतून रिया शशिकांत केरकर ८५.१७ टक्के मिळवून विशेष प्राविण्य श्रेणीसह प्रथम, कपिल वसंत गडेकर ७५.१७ टक्के विशेष प्राविण्य श्रेणीसह द्वितीय, मेघा शेट्ये ७२.३३ टक्के तृतीय आली. गौरंग गावडे ६९.६७ टक्के चौथा तर ज्योती गावडे ६६.८३ टक्के पाचवा, रोहन सोपटे ६५.६७ सहावा मिळवला. वाणिज्य शाखेत २ विशेष प्रावीण्य श्रेणीत, १० प्रथम श्रेणीत, १७ द्वितीय श्रेणीत तर उत्तीर्ण श्रेणीत पास झाले. विद्यार्थ्यांने आपल्या यशाची उज्वल परंपरा कायम राखल्याबद्दल श्री कमळेश्वर शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष ॲड. शाम शेट्ये, चेअरमन परशुराम गावडे, सचिव नीलकंठ थळी, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष सुनील शेट्ये, प्राचार्य जुही थळी यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

---

### मांद्रे सप्तेश्वर हायर सेकंडरीचा ८८ टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** गोवा शालान्त व उच्च माध्यमिक मंडळाने घेतलेल्या बारावी परीक्षेत, मांद्रे येथील सप्तेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८८.४६ टक्के लागला. दरवर्षीप्रमाणे, यंदाही विद्यालयाने घवघवीत यशाची परंपरा कायम राखल्याबद्दल पालकांत समाधान व्यक्त होत आहे.

या विद्यालयाच्या वाणिज्य शाखेचा निकाल ९० टक्के लागला आहे. विद्यालयाची आर्या जठार ७८ टक्के, द्वितीय रीचा पेडणेकर ६८ टक्के व योगिता पेडणेकर ६७ टक्के गुण मिळवून तृतीय आली. कला शाखेचां ९२ टक्के निकाल, यात प्रथम दीक्षा कांबळी ५७ टक्के, द्वितीय सेजल विश्वकर्मा ५६ टक्के व सुमन सैनी ५२ टक्के गुण मिळवून तृतीय आली. या विद्यालयाच्या व्यावसायिक विभागातील ऑफिस मॅनेजमेंट विभागाचा निकाल ९३.३३ टक्के लागला. यात प्रथम तन्वीर साटेलकर ७२ टक्के, द्वितीय नॅन्सी डिसोझा ६२ टक्के व दुर्वांकुर संदीप कामुलकर ६१ टक्के गुण मिळवून तृतीय आला. फॅशन ॲण्ड डिझायिंग विभागाचा ६७ टक्के निकाल, या विभागात प्रथम कु सायोनारा सानिया फर्नांडीस ७२ टक्के, द्वितीय ब्रिनेल फर्नांडिस ६७ टक्के व वीणा नाईक ६० टक्के गुण मिळवून तृतीय आली. सप्तेश्वर विद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम राखल्याबद्दल संस्थेचे चेअरमन ॲड. रमाकांत खलप, सचिव नारायण नाईक, प्रभारी प्राचार्य अरुण नाईक, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष महेश कांबळी व संस्थेच्या व्यवस्थापिका डॉ. प्रतीक्षा खलप व सदस्य आश्विन खलप यांनी अध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

---

### बांदिवडे महालक्ष्मी संस्थानात उद्या 'स्वर संपदा' मैफल


संपदा कदम


विष्णू शिरोडकर


प्रदीप पंडित



प्रवीण नाईक

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १ :** बांदिवडे येथील श्री महालक्ष्मी संस्थानात गुरुवार दि. ३ रोजी वार्षिक जत्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. सकाळपासून मंदिरात धार्मिक विधी,आरती तीर्थ प्रसाद, पालखी व रात्री ९ वाजता झी सारेगमप फेम व कलर्स मराठीवरील सुर नवा ध्यास नवा फेम उपविजेती प्रसिद्ध गायिका संपदा माने कदम (मुंबई) यांची भाव, भक्ती, नाट्य व चित्रपटगीतांची बहारदार मैफल 'स्वर संपदा' आयोजित करण्यात आली आहे. तिला विष्णू शिरोडकर (सिंथेसाइझर), रोहित बांदोडकर (तबला), शुभम नाईक (हार्मोनियम), किशोर तेली (पखवाज), प्रकाश आमोणकर (ऑक्टोपॅड), प्रदीप पंडित (निवेदक) व विनोद शिरोडकर साऊंड इंजिनिअर म्हणून बाजू सांभाळणार आहेत. या संपूर्ण कार्यक्रमाचे निर्मिती, संकल्पना प्रमुख प्रवीण नाईक आहेत. भाविकांनी मोठ्यासंख्येत उपस्थित राहून वार्षिक जत्रोत्सवाचा लाभ घ्यावा, असे देवस्थान समितीचे अध्यक्ष हर्षद कामत यांनी कळविले आहे.

# बीबीएलमध्ये विराट खेळणार ?

**मुंबई, दि. १ :**



विराट कोहली आता बाहेरच्या क्रिकेट लीगमध्ये खेळणार आहे. हो तुम्ही खरं ऐकताय, बिग बॅश लीग (बीबीएल) संघ सिडनी सिक्सर्सने घोषित केल आहे की, विराट कोहलीने त्यांच्यासोबत डील साईन केली आहे. मंगळवार १ एप्रिल रोजी घोषित केलेल्या या विषयामुळे सोशल मीडियावर चर्चांना उधाण आलेले आहे. ही घोषणा चकित करणारी आहे, कारण बीसीसीआयने भारतीय क्रिकेट खेळाडूंना विदेशी लीगमध्ये खेळण्याची परवानगी दिलेली नाही. इथे जाणून घ्या की, नक्की ही गोष्ट कितपत खरी आहे ?

सिडनी सिक्सर्सने त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंट वरून विराट कोहलीसोबत डील साइन केल्याची माहिती दिली. विराट सोबत फोटो सोबत कॅप्शन मध्ये लिहिलं आहे की, आता विराट कोहली पुढच्या दोन हंगामासाठी सिडनी सिक्सर्स संघाचा हिस्सा बनला आहे.

बीबीएलमध्ये स्टीव स्मिथ, सिडनी सिक्सर्स संघासाठी खेळतो. सिडनी सिक्सरने विराट कोहली सोबत डील साइन केलेली पोस्ट शेअर केली. त्यानंतर काही तासानंतर सांगितले की ही एक चेष्टा आहे. ही पोस्ट १ एप्रिल रोजी करण्यात आली आहे, ज्याला एप्रिल फुल दिवस देखील म्हटले जाते.

बीसीसीआयच्या नियमानुसार विराट कोहली बिग बॅश्लीगमध्ये किंवा अन्य विदेशी स्पर्धेत खेळणं असंभव आहे. बीसीसीआय त्यांच्या खेळाडूंना बाहेरच्या स्पर्धेत खेळण्याची परवानगी देत नाही. हे नियम बनवण्याचे मुख्य कारण म्हणजे, ज्यामुळे इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेची लोकप्रियता टिकून राहील. विराट कोहली बद्दल बोलायचे झाल्यास आयपीएल २०२५ मध्ये तो चांगल प्रदर्शन करत आहे, कोहलीने आतापर्यंत दोन सामन्यात ९० धावा केल्या आहेत.

विराट कोहलीने १५ सेकंदात त्याच्या चाहत्यांना सर्वात मोठा आनंद दिला आहे. त्याने चाहत्यांच्या मनात आणि हृदयात असलेल्या सर्वात मोठ्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. म्हणजे आता कोणताही संशय नाही किंवा कोणताही प्रश्न उरत नाही. चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर, विराट कोहलीच्या भविष्याबद्दल आणि २०२७ च्या विश्वचषकापर्यंत त्याच्या खेळण्याबद्दल बरीच चर्चा झाली. पण आता आयपीएलमध्ये कोहलीने त्याबाबत आपले हेतू स्पष्ट केले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या १५ सेकंदांपेक्षा कमी कालावधीच्या व्हिडिओमध्ये त्याने स्पष्टपणे म्हटले आहे की, त्याला २०२७ चा विश्वचषक खेळायचा आहेच, पण तो जिंकायचाही आहे.

## बीसीसीआयच्या करार यादीत रोहित-विराट ए-प्लस ग्रेडमध्येच

**मुंबई, दि. १ :**



टीम इंडियाचे स्टार क्रिकेटपटू विराट कोहली आणि रोहित शर्मा हे बीसीसीआयच्या केंद्रीय करारात ए प्लस ग्रेडमध्ये राहतील. बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टी-२० मधून निवृत्ती घेतल्यानंतरही दोन्ही खेळाडूंना ए प्लस ग्रेडमध्ये ठेवण्याचा विचार बोर्ड करत आहे. या श्रेणीत दोन्ही खेळाडूंना वार्षिक ७ कोटी रुपये मिळतील.

बोर्डाचा असा विश्वास आहे की या दोन्ही खेळाडूंना त्यांचा योग्य आदर मिळाला पाहिजे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टीम इंडियाचा नंबर ४चा फलंदाज आणि पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यर केंद्रीय करारात परतू शकतो. काही देशांतर्गत सामने न खेळल्यामुळे श्रेयस अय्यरला केंद्रीय करारातून वगळण्यात आले. अय्यरने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या ५ डावांमध्ये ७९.४१च्या स्ट्राईक रेटने २४३ धावा केल्या. या काळात त्याने दोन अर्धशतकेही झळकावली. त्याने अंतिम सामन्यात ६२ चेंडूत ४८ धावांची खेळी खेळली. तो स्पर्धेतील दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता.

एकदिवसीय आणि कसोटी संघाचे कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा हे + मध्ये राहतील. गेल्या वर्षी झालेल्या टी-२० विश्वचषकानंतर या तिघांनीही टी-२० फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याच वेळी, जसप्रीत बुमराह देखील + ग्रेडमध्ये राहील.

गेल्या वर्षी, श्रेयस आणि इशान किशन यांना स्थानिक क्रिकेट न खेळल्यामुळे बीसीसीआयच्या केंद्रीय करार यादीतून वगळण्यात आले होते. यानंतर, श्रेयसने देशांतर्गत क्रिकेटमध्ये पुनरागमन केले आणि गेल्या रणजी ट्रॉफीमध्ये मुंबईसाठी पाच सामन्यांमध्ये ४८० धावा केल्या. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये नऊ सामन्यांमध्ये ३४५ धावा करून श्रेयस चौथ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. विजय हजारे ट्रॉफी हंगामात त्याने शानदार कामगिरी केली.

# कुडचिरे येथे राष्ट्रीय शिक्षण कार्यशाळा

▶ 'कामाचे जग अंतर्गत करिअर कौशल्या'वर मार्गदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड




**डिचोली, दि. १ :** केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या पारख एनसीईआरटीने पारखच्या सीईओ आणि प्रमुख प्रा. इंद्राणी भादुरी यांच्या नेतृत्वाखाली पियम द्वितीय जे. जे. राणे सरकारी हायस्कूल कुडचिरे, डिचोली येथे दोन दिवसांची वर्क ऑफ वर्क कार्यशाळा आयोजित केली होती, ज्यामध्ये इयत्ता ८वी, ९वी आणि १0वीच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

प्रा. इंद्रायणी भादुरी यांनी त्यांच्या उद्घाटन भाषणात परखचे महत्त्व अधोरेखित केले. कामाचे जग ही कार्यशाळा ज्याचा उद्देश शैक्षणिक शिक्षण आणि व्यावहारिक करिअर कौशल्यांमधील अंतर भरून काढणे होता.

कार्यशाळेत २१व्या शतकातील कौशल्यांचा व्यावहारिक वापर करण्यावर भर देण्यात आला. ज्यामुळे विद्यार्थ्यांना वास्तविक जगातील व्यावसायिक परिस्थितीत त्यांची प्रासंगिकता समजण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांना देशभरात उपलब्ध असलेल्या विविध नोकरी भूमिकांबद्दल मार्गदर्शन करणारे ३७ क्षेत्रे शिकवली.

दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांना गटांमध्ये काम करायला लावण्यात आले आणि ३७ क्षेत्रांमधून त्यांना मिळालेल्या स्टार्टअप कल्पनांवर चार्ट सादर करण्यात आले. शाळेत एक विशेष करिअर कॉर्नर स्थापन करण्यात आला. वर्क (कामाचे जग) नावाची ही कार्यशाळा देशभरातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये परख एनसीईआरटीने नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना विविध करिअर पर्यायांचा शोध घेण्यासाठी, कौशल्य-निर्मिती क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता सारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी परिचित होण्यासाठी व्यासपीठ प्रदान करण्यासाठी घेतलेल्या उपक्रमाचा एक भाग होती.

याप्रसंगी मधुसूदन, श्रीमती यशवी मल्होत्रा आणि गुलाम रेशी, मुख्याध्यापिका सर्वेदा गावकर आणि वरिष्ठ शिक्षक विनय टकले उपस्थित होते. कार्यक्रमाच सूत्रसंचलन रंजन सिनारी यांनी केली.

# नाट्यकला जगाच्या कोपऱ्यात पोचण्यासाठी प्रयत्न

▶ मंत्री गोविंद गावडे : कला अकादमीतर्फेजागतिक रंगभूमी दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड


पणजी : जागतिक रंगभूमी दिनाचे उद्घाटन करतांना गोविंद गावडे. सोबत अरविंद खुटकर, दर्शन प्राशेर, प्रदीप गावकर व अवतांडील वर्षीमाश्विली.

**पणजी, दि. १ :** सांस्कृतिक अनुबंधासाठी कलेची देवाणघेवाण व्हायला हवी. आज रंगभूमीवर स्पर्धा वाढली आहे. आमची नाट्यकला जगाच्या कोपऱ्यात पोचण्यासाठी आमचे प्रयत्न आहेत, असे प्रतिपादन कला संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी येथे केले.

कला अकादमीतर्फे गुरुवारी एनजीओ कल्चरल डायव्हर्सिटी फॉर पीसफुल फ्युचर जॉर्जिया या संस्थेच्या सहयोगाने मास्टर दीनानाथ मंगेशकर कला मंदिरात जागतिक रंगभूमी दिन साजरा करण्यात आला त्यावेळी गोविंद गावडे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. व्यासपीठावर एनजीओ कल्चरल डायव्हर्सिटी फॉर पीसफुलफ्युचर जॉर्जिया चे समन्वयक दर्पण प्राशेर, कला अकादमीचे सदस्य सचिव अरविंद खुटकर, कार्यक्रम आणि विकास अधिकारी प्रदीप गावकर, यानिमित्ताने आयोजित केलेल्या लाईफ ऑफ ए क्लोन चे दिग्दर्शक अवतांदिल वर्षीमाशविली हे मान्यवर उपस्थित होते. गोविंद गावडे यांच्या हस्ते यावेळी लाईफ ऑफ ए क्लोन प्रयोगाचे दिग्दर्शक अवतांडील व श्री दर्पण यांचा तर अरविंद खुटकर व कला संस्कृती संचालनालयाचे संचालक सगुण वेळीप यांच्या हस्ते प्रयोगातील कलाकार जिओरजी जिकिया, जिगा काकुबावा, जिओरजी किलादझे, जिओरजी बार्बाकाद्झे व अभिनेत्री लारिसा, ऑपरेटर नी निकाबादझे यांचा सत्कार करण्यात आला. कला अकादमीचे कार्यक्रम अधिकारी संजीव झर्मेकर यांनी सूत्रसंचालन केले.

# मुंबई इंडियन्सचा दणदणीत विजय

## केकेआरचा ४३ चेंडू राखून केला मोठा पराभव | अश्वनी कुमारचे ४ विकेट्स

**मुंबई, दि. १ :**



सूर्यकुमार यादवचा षटकार, अश्वनी कुमारचे ४ विकेट्स, रायन रिकल्टनचे अर्धशतक अन् मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२५ मधील पहिला दणदणीत विजय मिळवला. मुंबईने घरच्या मैदानावर केकेआरला पराभवाचा मोठा धक्का दिला आहे. मुंबई इंडियन्सचा पदार्पणवीर अश्वनी कुमारचे ४ विकेट्स, सर्व गोलंदाजांची योग्य साथ आणि रायन रिकल्टनच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ८ विकेट्सने विजय मिळवला आहे. मुंबईने केकेआरला १६.२ षटकांत ११६ धावांवर सर्वबाद केले. तर नंतर ८ विकेट्सने आणि ४३ चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला.

मुंबई इंडियन्सला आयपीएल २०२५ च्या पहिल्या दोन्ही सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले होते. पण मुंबई इंडियन्सने केकेआरविरूद्ध तिसऱ्या सामन्यात पूर्ण ताकदीनिशी दणक्यात पुनरागमन केलं आहे. या विजयासह मुंबईचा संघ आयपीएल २०२५ च्या गुणतालिकेत अखेरच्या स्थानावरून थेट सहाव्या स्थानी पोहाचला आहे.

केकेआरने वानखेडेच्या मैदानावर दिलेल्या ११७ धावांच्या छोट्या लक्ष्याच्या प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सने सावध सुरूवात केली. रोहित शर्माने एक षटकार खेचला खरा पण तो पुन्हा एकदा फेल ठरला. रोहित शर्मा १३ धावांवर बाद झाला. तर यानंतर रायन रिकल्टनने संघाच्या विजयाची जबाबदारी केली. रिकल्टनने ४१ चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांसह ६२ धावांची खेळी केली. तर विल जॅक्सही १ षटकार लगावत १६ धावा करत बाद झाला.

वानखेडेच्या मैदानावर सूर्यकुमार यादव पुन्हा एकदा फॉर्मात परतला आणि त्याच्या वादळी फटकेबाजीचा एक नमुना पाहायला मिळाला. सूर्यकुमार यादव गेल्या काही काळात फॉर्मात नव्हता, पण वानखेडेच्या मैदानावर उतरताच सूर्याने आपली वादळी खेळी केली. सूर्याने ३०० च्या स्ट्राईक रेटने ९ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह २७ धावांची खेळी केली आणि संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. केकेआरकडून आंद्रे रसेलला दोन विकेट घेण्यात यश मिळाले.

मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय अगदी योग्य ठरला. बोल्ट आणि चहर या गोलंदाजी जोडीने केकेआरची झोप उडवली. संघाचे दोन्ही सलामीवीर १ धावा करत माघारी परतले. यानंतर अजिंक्य रहाणे ११ धावा तर अंगक्रिश रघुवंशी २६ धावाच करू शकला. रिंकू सिंग १७ धावा, मनिष पांडे १९ धावा तर रमणदीप सिंग २२ धावा करत बाद झाला.

मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांसमोर केकेआरच्या गोलंदाजांनी शरणागती पत्करली. पॉवरप्लेमध्येच केकेआरचा निम्मा संघ तंबूत परतला होता. मुंबईचा पदार्पणवीर अश्वनी कुमार या सामन्याचा हिरो ठरला. ज्याने ३ षटकांत २४ धावा देत ४ विकेट्स घेतले. दीपक चहरने २ तर बोल्ट, हार्दिक पंड्या, विघ्नेश पुथूर आणि सँटनर यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.



पर्ये-सत्तरी : पायीवारी प्रवेशिका अर्जाचे अनावरण करताना मोहन गावकर. बाजूला भिसो माजिक, क्रिशा मयेकर, कृष्णा गुरव, प्रकाश गावकर, अमरसिंग राणे, कृष्णा मयेकर व इतर वारकरी व भाविक.

# भूमिका वारकरी मंडळातर्फे गोवा ते पंढरपूर आषाढी पायीवारीचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**केरी, दि. १ :** पर्ये सत्तरी येथील श्री भुमिका प्रसन्न संत तुकाराम महाराज वारकरी मंडळातर्फे गोवा ते पंढरपूर अशी आषाढी एकादशी पहिली पायीवारीचे आयोजन करण्यात आले. या वारीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या वारकरी तसेच भाविक-भक्तांसाठी प्रवेशिका वितरण करण्यात आले.

या वारीच्या प्रवेशिका पर्येतील भूमिका प्रसाद कॅफे येथे ठेवण्यात आले असून इच्छुकांनी येथून अर्ज घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम या तत्त्वावर प्रवेशिका अर्ज स्वीकारल्या जातील.

दरम्यान या वारीच्या निमित्ताने २१ जून रोजी श्री भूमिका मंदिरात हरिपाठ, भजन, कीर्तन व इतर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. तर २२ जून रोजी पर्येतून पायी वारीचे पर्येतून पंढपूरला प्रस्थान होईल. त्यानंतर मंगळवार ३ जुलै रोजी दुपारी १२ वाजता पंढरपुरात दाखल होईल. त्यानंतर आषाढी एकादशी पर्यंत पंढपुरात वास्तव्य करून मंगळवार दि. ८ जुलै रोजी वारकरी पंढरपूर ते गोवा परतीचा प्रवास सुरू होईल. अधिक माहितीसाठी अध्यक्ष भिसो सातको माजीक (९७६५०६३०६३), सचिव क्रिशा कृष्णा मयेकर (माईणकर) (९१५८९१०९७२), खजिनदार महादेव बुधो राणे (८३९०८५२३५९), आनंद राणे, नारायण गावकर, पांडुरंग नाईक, योगेश गावस संजय गावस यांच्याशी संपर्क साधावा. वारकरी तसेच भाविकांना मोठ्या संख्येने या पायीवारीत सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांद्वारे करण्यात आले आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 209 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .